**आर बी आय / २००५-०६/ ८९**
**संदर्भ डी बी ओ डी क्रमांक ए एम एल . बीसी. २३/१४.०१.०६४/ २००५-०६**

ऑगस्ट २, २००५

प्रति,

अनुसूचित (शेड्युल्ड) वाणिज्य बँका तसेच
क्षेत्रीय ग्रामीण बँका यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रिय महोदय,

**<u>पूरग्रस्त व्यक्तींना बँकेत खाते उघडण्यासाठी सुलभीकरण</u>**

आमचे परिपत्रक डी बी ओ डी. क्र. ए एम एल. बी सी. ५८/ १४.०१.००१/ २००४-०५ दिनांक नोव्हेंबर २९, २००५ मध्ये 'आपल्या ग्राहकांची ओळख पटवा' बद्दल मार्गदर्शक सूचना बँकांना दिल्या होत्या. अवैध पैसे ( संपत्ती) चे वैध हस्तांतरण रोखण्यासाठी या सूचना होत्या खाते उघडतांना वरील परिपत्रकात ग्राहक- स्वीकार धोरण व ग्राहकांच्या ओळखी बाबतची कार्यरीत तयार करण्यास बँकांना कळविण्यात आले होते.

२. आपल्याला ठाऊकच असेल की अभूतपूर्व अशा पावसामुळे महाराष्ट्रांत मोठ्या संख्येने लोक संकटग्रस्त आहेत. राज्य सरकार अशा संकटग्रस्त लोकांना रु. ५०,००० ते रू २ लाख पर्यंत रक्कम मदत म्हणून चेकने देत आहे. अशा संकटग्रस्त लोकांचे बँकेत खाते असेलच असे नाही. संकटकाळी अशा लोकांना लवकरात लवकर खाते उघडता यावे म्हणुन बँकांनी कमीतकमी उपचार पाळावेत व अशा लोकांना त्वरित खाते उघडता यावे यासाठी खालील पर्याय उपलब्ध करण्यात येत आहेत.

अ) दुसऱ्या एखाद्या खातेदारांने दिलेली ओळख किंवा -
ब) संकटग्रस्त व्यक्तीजवळ मतदाराचे ओळखपत्र, वाहनचालक परवाना किंवा कार्यालय, कंपनी, शाळा, कॉलेज इ. संस्थानी दिलेले ओळखपत्र असेल आणि त्या व्यतिरिक्त वस्तीस्थान पुरावा म्हणुन तो वीजदेयक, शिधापत्रक दाखवू शकत असेल तर किंवा
क) वरील कागदपत्र असलेले, संकटग्रस्त व्यक्तीचे दोन शेजारी त्याची ओळख देत असतील तर किंवा
ड) वरील कोणत्याच बाबी शक्य नसल्यास बँकेला समाधानकारक वाटेल असा कोणताही दुसरा पुरावा.

आपला विश्वासू
प्रशांत सरन
मुख्य महाव्यवस्थापक